# प्रकरण I

## परिचय

# प्रकरण I

# परिचय

## 1.1 या अहवाला विषयी

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील विविध समूहांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय विभागांच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणाद्वारे उद्भवलेल्या बाबींशी संबंधित आहे. या कार्यालयाने लेखापरीक्षण केलेले विभाग आणि स्वायत्त संस्थांची समूहनिहाय यादी खालील **तक्ता 1.1** मध्ये दर्शविली आहे. याचा तपशील **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 1.1: या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केलेल्या विभाग आणि स्वायत्त संस्थांची समूहनिहाय यादी**

| समूहाचे नाव | विभागांची संख्या | स्वायत्त संस्थांची संख्या |
|---|---|---|
| आरोग्य व कल्याण | 07 | 04 |
| शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार | 05 | 03 |
| ग्रामीण विकास | 01 | -- |
| कृषि, अन्न व संलग्न उद्योग | 03 | -- |
| जलसंपदा | 02 | 01 |
| नगर विकास | 02 | 06 |
| संस्कृती व पर्यटन | 01 | -- |
| सामान्य प्रशासन | 03 | 01 |
| **एकूण** | **24** | **15** |

अनुपालन लेखापरीक्षण म्हणजे लेखापरीक्षण केलेल्या संस्थांचा खर्च आणि महसूल यांची तपासणी करून भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, लागू असलेले कायदे, नियम, विनियम आणि सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश आणि सूचना यांचे पालन केले जात आहे किंवा कसे हे तपासणे होय.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षण मानकांमध्ये अहवालासाठी भौतिक पातळी व्यवहारांचे स्वरूप, आकारमान आणि परिमाण यांच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कारवाई करण्यास सक्षम करणे आणि धोरणे आणि निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संघटनांची कार्यक्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारेल, अशा प्रकारे, चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

लेखापरीक्षणाचे अधिकार, संघटनात्मक रचना, नियोजन आणि लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि लेखापरीक्षणास शासनाचे प्रतिसाद यांचे स्पष्टीकरण या प्रकरणात दिले आहे. प्रकरण II मध्ये शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांमधील अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवलेली निरीक्षणे आहेत.

## 1.2 लेखापरीक्षणार्थी संस्थांची रुपरेषा

राज्यातील सचिवालय स्तरावरील विभागांचे नेतृत्व अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव करतात आणि त्यांना संचालक/आयुक्त तसेच कनिष्ठ अधिकारी सहाय्य करतात.

मागील वर्षाच्या तुलनेत 2022-24 दरम्यानचा राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश **तक्ता 1.2** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता 1.2: 2022-24 दरम्यानच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश**

**(₹ कोटीत)**

| जमा | | | | संवितरणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **2021-22** | **2022-23** | **2023-24** | | **2021-22** | **2022-23** | **2023-24** |
| **विभाग-अ: महसुली लेखे** | | | | | | | |
| कर महसूल | 220927.13 | 277486.31 | 302343.37 | सर्वसाधारण सेवा | 121745.32 | 130590.81 | 139874.71 |
| करेतर महसूल | 19306.70 | 16776.41 | 20857.94 | सामाजिक सेवा | 142523.26 | 163329.16 | 189224.05 |
| केंद्रीय कर/ शुल्कांचा हिस्सा | 54318.06 | 60000.97 | 71349.75 | आर्थिक सेवा। | 59454.77 | 80819.94 | 83363.03 |
| केंद्र सरकारकडून अनुदाने | 38759.68 | 51414.24 | 36045.40 | सहाय्यक अनुदाने व अंशदाने | 25962.54 | 32874.49 | 31888.67 |
| **एकूण विभाग-अ: महसुली जमा** | **333311.57** | **405677.93** | **430596.46** | **एकूण विभाग-अ: महसुली खर्च** | **349685.89** | **407614.40** | **444350.46** |
| **विभाग-ब: भांडवली लेखे व इतर** | | | | | | | |
| i) संकीर्ण भांडवली जमा | 0 | 0 | 0 | 1 सर्वसाधारण सेवा | 2681.21 | 3526.56 | 5579.89 |
| | | | | 2. सामाजिक सेवा | 4082.09 | 9134.20 | 15243.68 |
| | | | | 3. आर्थिक सेवा। | 39907.09 | 48982.85 | 51749.83 |
| | | | | **i)भांडवली खर्च (1+2+3)** | **46670.39** | **61643.61** | **72573.40** |
| ii) कर्ज आणि अग्रिमांची वसुली | 1178.88 | 642.62 | 742.20 | ii) कर्ज आणि अग्रिमांची संवितरणे | 2436.03 | 4664.41 | 4974.16 |
| iii) लोक ऋण जमा [1] | 90488.18[*] | 87572.84[#] | 125820.67[@] | iii) लोक ऋणांची परतफेड [2] | 35934.66[*] | 37665.79[#] | 40649.98[@] |
| iv) आकस्मिक निधीतून विनियोजने | 0.00 | 200.00 | 0.00 | iv) आकस्मिक निधी विनियोजन | 0.00 | 200.00 | 0.00 |
| v) आकस्मिक निधी | 0.00 | 200.00 | 0.00 | v) आकस्मिक निधी | 0.00 | 200.00 | 0.00 |
| vi) लोक लेखा जमा | 119376.52 | 143466.93 | 136495.89 | vi) लोक लेख्यांची संवितरणे | 100533.18 | 121973.69 | 123351.19 |
| vii) प्रारंभीची रोख शिल्लक | 68597.29 | 77692.29 | 81490.71 | vii)अंतिम रोख शिल्लक | 77692.29 | 81490.71 | 89246.74 |
| **एकूण विभाग-ब: जमा (i+ii+iii+iv+v+vi+vii)** | **279640.87** | **309774.68** | **344549.47** | **एकूण विभाग-ब संवितरणे (i+ii+iii+iv+v+vi+vii)** | **263266.55** | **307838.21** | **330795.47** |
| **एकूण एकंदर (अ+ब)** | **612952.44** | **715452.61** | **775145.93** | **एकूण एकंदर (अ+ब)** | **612952.44** | **715452.61** | **775145.93** |

[@] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹166.85 कोटी)

[#] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹7,129.25 कोटी)

[*] 91 दिवसांवरील अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹98.43 कोटी)

स्त्रोत :- संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

1 लोक लेखा जमांची आकडेवारी सकल आधारावर दर्शविली जाते.

2 लोक लेखा संवितरणांची आकडेवारी सकल आधारावर दर्शविली जाते.

## 1.3 लेखापरीक्षणासाठी प्राधिकार

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 149 आणि 151 आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 अन्वये भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांना लेखापरीक्षणाचे प्राधिकार प्राप्त झाले आहेत. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामधील महसूल व खर्चाचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी निर्गमित केलेल्या भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या तरतुदींनुसार आणि लेखापरीक्षा आणि लेख्यांची नियमावली, 2020 नुसार करतात.

## 1.4 प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर, या कार्यालयांची संघटनात्मक संरचना

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या निर्देशानुसार, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर ही कार्यालये, त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध शासकीय विभाग व कार्यालये आणि स्वायत्त संस्थांचे (लेखापरिक्षित संस्था) लेखापरीक्षण करतात. **तक्ता 1.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात आठ समूह आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात उर्वरित आठ समूह येतात.

**तक्ता 1.3: समुहांचा तपशील**

| अ. क्र. | प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या लेखापरीक्षा अधिकार क्षेत्रातील समूह | महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखापरीक्षा अधिकार क्षेत्रातील समूह |
|---|---|---|
| 1 | आरोग्य व कल्याण | ऊर्जा व वीज |
| 2 | शिक्षण, कौशल्य विकास व रोजगार | उद्योग व वाणिज्य |
| 3 | ग्रामीण विकास | परिवहन |
| 4 | कृषी, अन्न व संलग्न उद्योग | पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान |
| 5 | जल संपदा | सार्वजनिक बांधकामे |
| 6 | नगर विकास | वित्त |
| 7 | संस्कृती व पर्यटन | माहिती तंत्रज्ञान व दळणवळण |
| 8 | सामान्य प्रशासन | कायदा व सुव्यवस्था |

## 1.5 लेखापरीक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी

लेखापरीक्षण प्रक्रिया ही लेखापरिक्षित संस्थांचे खर्च आणि प्राप्त झालेला महसूल, उपक्रमांची गंभीरता आणि गुंतागुंत, प्रत्यायोजित वित्तीय अधिकारांची पातळी आणि एकूण अंतर्गत नियंत्रणे आणि हितैषींच्या समस्या यांचे निर्धारण यावर आधारित लेखापरिक्षित संस्थांना भेडसावणाऱ्या जोखमांचे निर्धारण करून सुरू होते. या प्रक्रियेत

मागील लेखापरीक्षण निष्कर्षांचाही विचार केला जातो. या जोखीम निर्धारणाच्या आधारे लेखापरीक्षणाची वारंवारता आणि व्याप्ती निश्चित केली जाते. 2022-24 दरम्यान 711 घटकांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 12,037 लेखापरीक्षण मनुष्य दिवस वापरण्यात आले. लेखापरीक्षण नियोजनात अशा घटकांचा/ संस्थांचा समावेश होता जे लक्षणीय समस्यांसाठी धोकादायक असल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले होते.

प्रत्येक घटकाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर तपासणी केलेल्या कार्यालयप्रमुखांना लेखापरीक्षण निष्कर्ष असलेले निरीक्षण अहवाल दिले जातात. तपासणी केलेल्या कार्यालयप्रमुखांनी निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एका महिन्याच्या आत लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांची उत्तरे सादर करावीत, असे आवाहन करण्यात येते. जेव्हा उत्तरे प्राप्त होतात, तेव्हा लेखापरीक्षणाचे निष्कर्ष एकतर निकाली काढले जातात किंवा अनुपालनासाठी पुढील कार्यवाहीचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालातून उद्‌भवणाऱ्या महत्त्वपूर्ण लेखापरीक्षण निरीक्षणांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अन्वये राज्यपालांना सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्याची प्रक्रिया केली जाते.

## 1.6 लेखापरीक्षणास शासनाचा प्रतिसाद

### 1.6.1 प्रलंबित निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांच्या व्यवहारांची चाचणी-तपासणी करण्यासाठी आणि विहित नियम व कार्यपद्धतीनुसार त्यांच्या लेखांकनाचे आणि इतर महत्वपूर्ण दस्तऐवज ठेवले जात आहेत अथवा नाहीत याची पडताळणी करण्यासाठी त्यांच्या नियतकालिक तपासण्या केल्या जातात. या तपासण्यानंतर निरीक्षण अहवाल तयार केले जातात जे तपासणी केलेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना पाठविण्यात येतात आणि त्यांच्या प्रती निकटतम वरिष्ठ प्राधिका-यांना पाठविण्यात येतात. या निरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षण अभिक्षणांवर केलेल्या कार्यवाहीवर संनियंत्रण करणे सुलभ व्हावे यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांना प्रलंबित निरीक्षण अहवालांचे अर्धवार्षिक अहवाल पाठविण्यात येतात.

जून 2024 पर्यंत 3,623 निरीक्षण अहवाल (13,847 अभिक्षणे) निपटाऱ्यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल आणि अभिक्षणे यांचा वर्ष-निहाय तपशील **परिशिष्ट 1.2** मध्ये दर्शविला आहे. असे निदर्शनास आले की 7,048 अभिक्षणे असलेले 2,496 निरीक्षण अहवाल पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. यावरून असे निदर्शनास येते की लेखापरीक्षण अहवालातील त्रुटींचे निराकरण करण्यासाठी समयोचित व प्रभावी पावले उचलली जात नाहीत.

### 1.6.2 विभागीय लेखापरीक्षा समिती

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना, प्रलंबित निरीक्षण अहवाल व अभिक्षणे यांचे पुनरावलोकन आणि निराकरण करण्यासाठी, लेखापरीक्षण समिती स्थापित करून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश (डिसेंबर 1985) दिले. लेखापरीक्षण समित्यांचे अध्यक्ष प्रशासकीय विभागाचे सहसचिव असून, सहसंचालक, लेखा व कोषागारे हे सदस्य म्हणून आणि उपसंचालक, लेखा व कोषागारे हे निमंत्रक असतात. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार पदापेक्षा कमी नसलेला प्रतिनिधी लेखापरीक्षण समितीला सहाय्य करतो. लेखापरीक्षण समितीच्या बैठका प्रत्येक तिमाहीत किमान एकदा तरी आयोजित करणे आवश्यक आहे.

**तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2022-24 दरम्यान लेखापरीक्षण समितीच्या तीन बैठका आयोजित केल्या होत्या.

**तक्ता 1.4: 2022-24 दरम्यान लेखापरीक्षण समितीच्या बैठकांचे आयोजन**

| अ.क्र | प्रशासकीय विभागाचे नाव | बैठकांची संख्या | बंद केलेल्या निरीक्षण अहवालांची संख्या | बंद केलेल्या परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | महसूल व वन | 1 | 26 | 480 |
| 2 | जल संपदा | 1 | 42 | 214 |
| 3 | आदिवासी विकास | 1 | 14 | 98 |
| **एकूण** | | **3** | **82** | **792** |

**तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे निरीक्षण अहवाल आणि अभिक्षणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असतानाही लेखापरीक्षण समितीच्या बैठका फारच कमी प्रमाणात आयोजित केल्या होत्या. तसेच, 2022-24 दरम्यान, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रातील 24 प्रशासकीय विभागांपैकी फक्त तीन विभागांनी लेखापरीक्षण समिती बैठकीचे आयोजन केले होते.

### 1.6.3 प्रारूप परिच्छेदांना विभागांचा प्रतिसाद

मार्च 2024 व डिसेंबर 2025 दरम्यान 16 प्रारुप परिच्छेद (दोन विषयनिष्ठ लेखापरीक्षणांसहित) संबंधित विभागांच्या अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिवांना अर्धशासकीय पत्राद्वारे चार आठवडयाच्या आत उत्तर पाठविण्याच्या विनंतीसह पाठविण्यात आले. दोन विषयनिष्ठ लेखापरीक्षणे आणि चार प्रारुप परिच्छेदासंबंधी शासनाची उत्तरे प्राप्त झाली, परंतु या अहवालातील दहा प्रारुप परिच्छेदासंबंधी कोणतेही उत्तर प्राप्त झाले नव्हते.

### 1.6.4 लेखापरीक्षण अहवालांचा पाठपुरावा

जानेवारी 2001 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने जारी केलेल्या सूचनांनुसार, राज्य विधानमंडळाला लेखापरीक्षण अहवाल सादर केल्यावर तीन महिन्यांच्या आत

प्रशासकीय विभागांनी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या परिच्छेदांविषयी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लेखापरीक्षकांच्या पडताळणीनंतर महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, प्रशासकीय विभागांनी या निर्देशांचे पूर्णत: अनुपालन केले नव्हते. वर्ष 2012-13 ते 2021-22 दरम्यानची प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.3** मध्ये विभाग-निहाय तपशील दर्शविला आहे.

**तक्ता 1.5: 2012-13 ते 2021-22 दरम्यानची स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रलंबिततेची स्थिती**

| लेखापरीक्षण अहवाल | अहवाल सादर करण्याचा दिनांक | परिच्छेदांची व आढाव्यांची संख्या | प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| 2012-13 | 14 जून 2014 (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) | 15 | 14 | 1 |
| | 24 डिसेंबर 2014 (आर्थिक क्षेत्र | 6 | 5 | 1 |
| | 14 जून 2014 (राजस्व क्षेत्र) | 7 | 6 | 1 |
| 2013-14 | 10 एप्रिल 2015 (राजस्व क्षेत्र) | 5 | 4 | 1 |
| 2014-15 | 13 एप्रिल 2015 (राजस्व क्षेत्र) | 5 | 4 | 1 |
| 2016-17 | 20 जुलै 2018 (राजस्व क्षेत्र) | 4 | 3 | 1 |
| 2017-18 | 04 मार्च 2020 (राजस्व क्षेत्र) | 4 | 3 | 1 |
| | 04 मार्च 2020 (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) | 9 | 9 | 0 |
| 2018-19 | 08 सप्टेंबर 2020 (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) | 12 | 10 | 2 |
| | 08 सप्टेंबर 2020 (आर्थिक क्षेत्र) | 7 | 6 | 1 |
| | 08 सप्टेंबर 2020 (राजस्व क्षेत्र) | 5 | 4 | 1 |
| | 08 सप्टेंबर 2020 (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) | 1 | 1 | 0 |
| 2019-20 | 25 मार्च 2022 (अनुपालन लेखापरीक्षण अहवाल) | 11 | 8 | 3 |
| 2020-21 | 25 मार्च 2022 (अनुपालन लेखापरीक्षण अहवाल) | 1 | 1 | 0 |
| वर्ष 2022 चा अहवाल क्रमांक 3 | 25 ऑगस्ट 2022 महाराष्ट्रातील 74 व्या संविधान सुधारणा अधिनियम | 1 | 0 | 1 |

| लेखापरीक्षण अहवाल | अहवाल सादर करण्याचा दिनांक | परिच्छेदांची व आढाव्यांची संख्या | प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| | यावरील संपादणूक लेखापरीक्षण | | | |
| वर्ष 2022 चा अहवाल क्रमांक 4 | 30 डिसेंबर 2022 भूपृष्ठ सिंचनातील परिणामांवर निष्पादन लेखापरीक्षण अहवाल | 1 | 0 | 1 |
| वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 1 | 25 मार्च 2023 महाराष्ट्र शासनाद्वारे सार्वजनिक सेवांचे वितरण | 1 | 0 | 1 |
| वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 4 | 4 ऑगस्ट 2023 इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षण अहवाल | 1 | 0 | 1 |
| वर्ष 2024 चा अहवाल क्रमांक 2 | 21 डिसेंबर 2024 महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन यावरील संपादणूक लेखापरीक्षण अहवाल | 1 | 0 | 1 |
| **एकूण** | | **97** | **78** | **19** |

**तक्ता 1.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, डिसेंबर 2024 पर्यंत लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट 97 परिच्छेद आणि आढाव्यांपैकी, 19 स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्रलंबित होती.

प्रलंबित लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व मुद्दयांविषयी कार्यकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याच्या उद्देशाने लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती प्रत्येक प्रकरणांत तिच्या शिफारशींवर विभागांनी किती कालावधीत कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्या पाठविणे आवश्यक आहे ते निश्चित करते.

2010-11 ते 2016-17 या वर्षासाठीच्या लेखापरीक्षण अहवालांशी संबंधित 155 परिच्छेदांवर लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीमध्ये चर्चा करण्यात आली आणि 702 शिफारशी देण्यात आल्या, ज्यापैकी 415 शिफारशींवरील केलेल्या कार्यवाहीच्या टिप्पण्या प्रलंबित होत्या जे **तक्ता 1.6** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 1.6: लोकलेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींवरील कार्यवाही केल्याच्या प्रलंबित टिप्पण्यांची स्थिती**

| लेखापरीक्षण अहवालाचे वर्ष | लेखापरीक्षण अहवाल | लोक लेखा समितीचा व सार्वजनिक उपक्रम समिती अहवाल क्रमांक | लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीचे वर्ष | लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची संख्या | कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्यांची प्रलंबित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 2010-11 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 12 | 2015-16 | 15 | 9 |
| | राजस्व क्षेत्र | 9 | 2015-16 | 15 | 2 |
| | | 16 | 2015-16 | 11 | 9 |
| | सार्वजनिक उपक्रम समिती | 8 | 2015-16, | 6 | 1 |
| 2011-12 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 29 | 2017-18 | 44 | 27 |
| | आर्थिक क्षेत्र | 35 | 2017-18 | 9 | 2 |
| | राजस्व क्षेत्र | 26 | 2015-16 | 19 | 19 |
| | | 33 | 2017-18 | 13 | 8 |
| | सार्वजनिक उपक्रम समिती | 11 | 2015-16 | 10 | 1 |
| 2012-13 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 24 | 2015-16 | 18 | 17 |
| | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 27 | 2017-18 | 48 | 48 |
| | आर्थिक क्षेत्र | 38 | 2017-18 | 31 | 3 |
| | | 64 | 2017-18 | 120 | 80 |
| | राजस्व क्षेत्र | 37 | 2017-18 | 15 | 2 |
| 2013-14 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 19 | 2015-16 | 47 | 31 |
| | आर्थिक क्षेत्र | 23 | 2015-16 | 26 | 26 |
| 2014-15 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 47 | 2017-18 | 24 | 5 |
| | | 52 | 2017-18 | 37 | 2 |
| | | 57 | 2017-18 | 23 | 10 |
| | आर्थिक क्षेत्र | 46 | 2017-18 | 14 | 4 |
| | राजस्व क्षेत्र | 54 | 2017-18 | 37 | 15 |
| 2015-16 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 40 | 2017-18 | 16 | 4 |
| | | 41 | 2017-19 | 16 | 13 |
| | राजस्व क्षेत्र | 56 | 2017-18 | 19 | 10 |
| 2016-17 | सामान्य आणि सामाजिक क्षेत्र | 58 | 2017-18 | 13 | 13 |
| | | 59 | 2017-18 | 5 | 3 |
| | | 67 | 2017-18 | 51 | 51 |
| **एकूण** | | | | **702** | **415** |

लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीच्या ज्या शिफारशींवर कार्यवाही केल्याबद्दल टिप्पण्या प्राप्त झाल्या नव्हत्या त्यांची विभाग-निहाय स्थिती **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 16 विभागांकडून प्रलंबित असलेल्या 415 शिफारशींवरील कार्यवाही केल्याबद्दलच्या टिप्पण्या प्रलंबित होत्या. कार्यवाही केल्याबद्दलच्या सर्वाधिक टिप्पण्या (172 कार्यवाही केल्याच्या टिप्पण्या) या जलसंपदा विभागाकडे प्रलंबित होत्या.